# जीवनाच्या प्रवासात माणुसकी महत्वाचा दुवा -आमदार प्रशांत ठाकूर

पनवेल (प्रतिनिधी) जीवनात जन्मानंतर मृत्यू अटळ आहे, त्यामुळे आपण किती जगलो त्यापेक्षा कसे जगलो याला महत्व असून जीवनाच्या प्रवासात माणुसकी महत्वाचा दुवा आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी तक्का येथे झालेल्या कार्यक्रमात केले. तक्का येथील राजस्थानी स्मशानभुमीच्या आवारात युवा नेते गणेश वाघिलकर यांच्या पुढाकाराने लावण्यात आलेल्या सुविचार फलकांचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, जीवनाच्या प्रवासात मृत्यूपासून कुणीही लांब जाऊ शकत नाही, आज ना उद्या प्रत्येकाचा मृत्यू अटळ आहे, पण या जीवनाच्या प्रवासात सामाजिक जाणीव ठेवून प्रत्येकाने सत्कार्य करत कार्यरत राहिले पाहिजे असे सांगून फळाची अपेक्षा न करता कार्य केल्याने खऱ्या अर्थाने जीवन सार्थकी लागत असते, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले. तसेच स्मशानभुमीच्या परिसरात लावण्यात आलेल्या फलकांच्या स्त्युत्य उपक्रमासाठी कार्यक्रमाचे आयोजक गणेश वाघिलकर, अत्यविधी सेवा समितीचे अध्यक्ष प्रदीप ठाकरे, ओम साई मंडळ, एकविरा युवक मंडळ, जरी मरी महिला मंडळ, एकविरा नागरी सहकारी पतपेढी, ओम साई महिला मंडळ, पनवेल जनता सहकारी पतपेढी, ग्रामस्थ मंडळ तक्का, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका वंदना बहिरा, विभागीय अध्यक्ष मनोहर मुंबईकर, रघुनाथ बहिरा, सागर बहिरा, संजय बहिरा आदींना त्यांनी धन्यवादही दिले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा चारूशिला घरत, उपनगराध्यक्ष मदन कोळी, गटनेते अनिल भगत, बांधकाम सभापती राजू सोनी, नगरसेवक मनोहर म्हात्रे, गणपत म्हात्रे, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, ज्येष्ठ नेते यशवंत फके, जगन्नाथ बहिरा, रघुनाथ बहिरा, विभागीय अध्यक्ष मनोहर मुंबईकर, शिवकर ग्रामपंचायत सरपंच मिनाक्षी ढवळे, शिक्षण मंडळाचे सदस्य सागर बहिरा, ज्येष्ठ कार्यकर्ते अशोक बहिरा, अण्णा भगत, राजू बहिरा, अशोक नाईक, डॉ. रेखा बहिरा, अंत्यविधी सेवा समितीचे प्रदीप ठाकरे, श्री. पवार, महेंद्र फके, बबन कांबळे यांच्यासह कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.